**"मागेल त्याला शेततळे" योजनेअंतर्गत कार्यारंभ आदेश दिल्यानंतर शेततळयाचे काम पूर्ण करण्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या कालावधीस मुदतवाढ देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग (रोहयो)**
शासन निर्णय क्रमांक : शेततळे-२०१८/प्र.क्र.६/रोहयो-५
नवीन प्रशासन भवन, १६ वा मजला,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- २८ नोव्हेंबर, २०१८.

**वाचा:-**

**१.** नियोजन विभाग शासन निर्णय क्रमांक : शेततळे-२०१६/प्र.क्र.१ (७४)/रोहयो-५, दि.१७.०२.२०१६.
**२.** नियोजन विभाग शासन निर्णय क्रमांक शेततळे-२०१८/ प्र.क्र. ६ /रोहयो-५ दि. ११.०४.२०१८
**३.** संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, कृषि आयुक्तालय, पुणे यांचे दि.१२.०९.२०१८ चे पत्र

**प्रस्तवना:-**

"मागेल त्याला शेततळे" या योजनेअंतर्गत कार्यारंभ आदेश दिल्यावर शेततळयाचे काम पूर्ण करण्याबाबत संदर्भ क्र.२ येथे नमूद दि.११.४.२०१८ च्या शासन निर्णयात नमूद अटी शिथील करण्याची विनंती संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, कृषि आयुक्तालय, पुणे यांनी संदर्भ क्र.३ येथे नमूद दिनांक १२.०९.२०१८ च्या पत्रान्वये केली आहे. त्यानुषंगाने कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यास अनुसरून खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

संदर्भ क्र.२ येथे नमूद दिनांक ११.०४.२०१८ च्या शासन निर्णयामध्ये **"कार्यारंभ आदेश दिल्यानंतर लाभार्थ्यांनी दिनांक ३० जून, २०१८ पर्यंत शेततळयाचे काम पूर्ण करावे"** अशी तरतूद करण्यात आली आहे. सदर अट रद्द करुन त्यांमध्ये **"कार्यारंभ आदेश दिल्यानंतर लाभार्थ्यांनी दिनांक ३१ मार्च, २०१९ पर्यंत शेततळयाचे काम पूर्ण करावे"** अशी सुधारणा करण्यात येत आहे

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**(डॉ. प्रमोद शिंदे)**
उपसचिव , महाराष्ट्र शासन

C:\Users\jaywant.nagargoje\Desktop\EGs-५\२०१८\शेततळे\कार्यारंभ आदेशास मुदतवाढ देणे बाबत..docx

प्रति,

मा.मंत्री (रोहयो) यांचे खाजगी सचिव
मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद
सचिव (रोहयो) यांचे स्विय सहायक
आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
सर्व विभागीय कृषि सहसंचालक,
संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य, पुणे,
सर्व संचालक, कृषि आयुक्तालय, पुणे,
सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
महालेखापाल, (लेखापरिक्षा), महाराष्ट्र १ / २, मुंबई / नागपूर,
महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ / २, मुंबई / नागपूर,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
सर्व उपसचिव/अवर सचिव / कार्यासन अधिकारी, (रोहयो)
निवडनस्ती मग्रारो-५.

C:\Users\jaywant.nagargoje\Desktop\EGs-५\२०१८\शेततळे\कार्यारंभ आदेशास मुदतवाढ देणे बाबत..docx